# इंडिया फाउंडेशन फॉर द आर्ट्स (IFA)

## कला व्यवहारविषयक उपक्रमांतर्गत

## 'कला मंच' प्रस्ताव प्रस्तुतीसाठी आवाहन

## अर्ज पाठवण्याची अंतिम तारीख: ३१ ऑगस्ट २०२६

कलाकारांना आपल्या सध्याच्या कार्यपद्धतींचा नवीन दिशांनी विस्तार करता येईल असे प्रकल्प राबवण्यास कलाव्यवहारविषयक उपक्रम इच्छुक आहे. हे प्रकल्प प्रस्थापित संकेत किंवा रूढींना आव्हान देऊ शकतात; आशय, स्वरूप आणि माध्यमाच्या क्षेत्रात नवनवीन सीमा विस्तारू शकतात; तसेच अवकाश, प्रेक्षक आणि समुदाय यांच्याशी संवादाचे व सहभागाचे नवे मार्ग शोधून प्रयोगाशीलतेची भावना अधोरेखित करू शकतात.

**कला मंच**

कलाकार म्हणून अनेकदा आपल्याला एकमेकांच्या सहकार्याने केलेल्या कलानिर्मितीद्वारे सामूहिक कृती प्रवृत्त करत एकत्र येण्याची गरज वाटते. जेव्हा विविध प्रदेश, कार्यपद्धती आणि पिढ्यांमधील कलाकार एकत्र येतात, तेव्हा त्यांना समवयस्क गट, नेटवर्क्स आणि समुदाय निर्माण करणे शक्य होते; याद्वारे ते विविध संकल्पना व तंत्रांवर चर्चा करू शकतात, तसेच त्यांत नवनवीन प्रयोग व सुधारणा करू शकतात. ज्ञान-आदानप्रदान, संवाद, चर्चा, अध्ययन आणि सामूहिक विकासासाठी अवकाश निर्माण करून, हे **मंच** कलात्मक ऊर्जांच्या अनपेक्षित संगमासाठी महत्त्वपूर्ण केंद्रबिंदू ठरतात.

असे मंच प्रगतीशील कलाकारांना सामाजिक-राजकीय घटनांना प्रभाविपणे प्रतिसाद देण्यास, कलाप्रकारांसाठी शाश्वत चौकट तयार करण्यास आणि सशक्त कला समुदाय उभारण्यास सक्षम करू शकतात. **कला मंच** सर्वांना एकत्र येण्यासाठी व संसाधनांचा योग्य वापर करण्यासाठी प्रोत्साहन देऊन समावेशकता, अनुकूलता आणि दीर्घकालीन प्रभावाला प्राधान्य देतात. या कलात्मक प्रक्रिया काळानुरूप बदलणाऱ्या संदर्भांशी सुसंगत राहतील यासाठी हे मंच नाविन्यता, एकता आणि कलाक्षेत्रातील सामूहिक कार्यक्षमतेची मूल्ये जपतात.

कला व्यवहारविषयक उपक्रमांतर्गत आम्ही कला मंचांसाठी प्रस्ताव आमंत्रित करत आहोत. या **कला मंचां**मधे कार्यशाळा, निवासी कार्यक्रम, कलाकारांची संमेलने समाविष्ट असू शकतात. या मंचांचा उद्देश नेटवर्क आणि जागा (प्रत्यक्ष, ऑनलाइन किंवा दोन्हीचे मिश्रण) तयार करणे आणि चालवणे हा असावा. या प्रकल्पांनी विविध कलाक्षेत्रांतील किंवा त्यापलीकडील कलाकारांना एका समान व्यासपीठावर एकत्र आणले पाहिजे, जेणेकरून विचारांची देवाणघेवाण वाढेल, सहकार्याला प्रोत्साहन मिळेल, सर्जनशीलतेला वाव मिळेल आणि त्यांच्या कला पद्धतींना शाश्वतता मिळेल.

**प्रकल्पाचा कालावधी:**

१२ महिन्यांपर्यंत

**आर्थिक आराखडा:**

जास्तीत जास्त रू. ३,००,०००/-

**प्रकल्प प्रस्ताव कोण पाठवू शकतं ?**

एका किंवा विविध कलाप्रकारांत काम करणाऱ्या व्यक्तींकडून आम्ही प्रस्ताव मागवत आहोत. यामध्ये खालील व्यक्तींचा समावेश असू शकतो:

- संगीत, ध्वनी, लेखन, नृत्य, नाटक, कठपुतळी, कथाकथन, जादू, सर्कस आणि इतर कला निगडीत क्षेत्रांमधील कलाकार
- चित्रपट (माहितीपट आणि काल्पनिक कथा), ॲनिमेशन, छायाचित्रण, इन्स्टॉलेशन, नवीन माध्यमे, क्रिएटिव्ह कोडिंग, कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबॉटिक्स, इंटरॅक्टिव्ह कला, गेमिंग/कॉन्सेप्ट कला, चित्रकला, शिल्पकला, छाप निर्मिती, कॉमिक पुस्तके, ग्राफिक नॅरेटिव्ह, आर्टिस्ट बुक्स, आणि इतर दृश्य कला प्रकारांमधे काम करणारे कलाकार
- क्युरेटर्स, विशेषतः गॅलरी संदर्भाबाहेर काम करणारे
- कवी, कादंबरीकार, लघुकथा लेखक, नाटककार, चित्रपट पटकथा लेखक, कॉमिक्स लेखक, गेम लेखक, क्रिएटिव्ह नॉनफिक्शन लिहिणारे, साहित्यिक कलांमध्ये काम करणारे
- आंतरविद्याशाखीय विभागामध्ये कार्य करणारे अभ्यासक

**प्रस्ताव पाठवण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे:**

तुम्ही तुमचा प्रस्ताव इंग्रजी किंवा कोणत्याही भारतीय भाषेत लिहू शकता. IFA इंग्रजी व्यतिरिक्त इतरही भारतीय भाषांमधे प्रस्ताव सादर करण्यास प्रोत्साहन देते.

प्रस्ताव पाठवताना त्यात खालील माहितीचा समावेश करा:

- आपली विद्यमान कला, आवड आणि चिंतन परीघ
- कला मंच जोपासण्यासाठीची आपली प्रेरणा
- आपण सुरू करू इच्छित असलेलया कला मंचाचे तपशील - उद्देश, सहभागी भागीदार आणि सहयोगी, व तो मंच सक्रिय करण्यासाठी नियोजित केलेली जागा, ठिकाण किंवा स्थानाची माहिती
- तपशीलवार वेळापत्रक
- सर्वसमावेशक आर्थिक आराखडा

- या अर्जाशी संबंधित आधी केलेल्या कार्याची माहिती
- आपला CV, पत्ता, संपर्क क्रमांक आणि ईमेल आयडी
- आपला अंतिम प्रस्ताव, एकाच ई-मेल मधे, John Xaviers, Programme Officer: Arts Practice यांना john@indiaifa.org. या ईमेल पत्त्यावर पाठवा. या ई-मेल च्या subject line मधे Project Proposal for Arts Platforms (Arts Practice) लिहा.
- कोणत्याही प्रश्नांसाठी आणि स्पष्टीकरणांसाठी कृपया john@indiaifa.org याच ईमेल पत्त्यावर संपर्क करा.

**पात्रता:**

- फक्त भारतीय नागरिकच अर्ज करू शकतात. यामध्ये पीआयओ (पर्सन्स ऑफ इंडियन ओरिजिन / भारतीय वंशाच्या व्यक्ती) आणि ओसीआय (ओव्हरसीज सिटिझन ऑफ इंडिया / भारतीय मुळाचे परदेशी नागरिक) कार्डधारकांचा समावेश नाही.
- अर्जदारांकडे ओळख आणि नागरिकत्वाच्या पुराव्यासाठी पॅन कार्ड आणि खालीलपैकी एक असणे आवश्यक आहे - भारतीय पासपोर्ट किंवा आधार कार्ड किंवा भारतातील मतदार ओळखपत्र.
- केवळ व्यक्ती अर्ज करू शकतात. कोणत्याही प्रकारच्या संस्था अर्ज करू शकत नाहीत.
- प्रकल्पांमध्ये सहयोगी असेलेल्या सर्वांनी भारतीय नागरिक असले पाहिजे.
- IFA बरोबरच्या व्यवहारामधे आर्थिक गुन्ह्यांचा भूतकाळ असलेल्या व्यक्ती पात्र नाहीत.
- IFA सोबत मान्य केलेल्या व्यावहारिक बाबींची (डिलिव्हरेबल्स ची) पूर्तता न केलेल्या IFA अनुदानित व्यक्ती पात्र नाहीत.
- कोणत्याही कारणास्तव भविष्यात अर्ज करण्यास मनाई करणारे पत्र IFA कडून मिळालेल्या व्यक्ती पात्र नाहीत.
- IFA द्वारे राबविल्या जाणाऱ्या प्रकल्पावर सध्या काम करत असलेल्या व्यक्ती पात्र नाहीत.
- जर संयुक्त बँक खाते असेल तरच अशा एकापेक्षा अधिक व्यक्ती अर्ज करू शकतात. असे संयुक्त खाते नसलेल्या समूहांमधील केवळ एका व्यक्तीनेच समूहातील इतरांना सहयोगी म्हणून सोबत घेत अर्ज करावा.

**निवड प्रक्रिया:**

एक बाह्य पॅनेल शॉर्टलिस्ट केलेल्या प्रस्तावांचे मूल्यांकन करेल आणि अर्जदारांना त्यांचे प्रकल्प पॅनेलसमोर सादर करावे लागतील.

**सर्व निवडलेले प्रकल्प IFA द्वारे अंमलात आणले जातील.**

**महत्त्वाच्या तारखा**

- IFA कर्मचाऱ्यांकडून प्रतिसाद मिळवण्यासाठी तुमचे प्रश्न आणि कल्पनांचे मसुदे लेखी, ऑडिओ किंवा व्हिडिओ स्वरूपात पाठवण्याची अंतिम तारीख: **२१ ऑगस्ट २०२६**
- प्रस्ताव पाठवण्याची अंतिम तारीख: **३१ ऑगस्ट २०२६**
- निवडलेले प्रकल्प जाहीर करण्याची तारीख: **नोव्हेंबर २०२६**

***कृपया लक्षात घ्या: मुलांसह सर्वांना साहाय्य दिले जाईल, सर्वांचा आदर केला जाईल आणि सर्वांचे संरक्षण केले जाईल असे सुरक्षित वातावरण निर्माण करण्यासाठी IFA वचनबद्ध आहे. अर्जदाराने सुद्धा हे पाळणे अनिवार्य आहे.***